# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-2557266/46 कार्यासन दु. क्र. 0712-2557266
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

क्र.तशिस/विकाना/शैवि-1/सुर्क./2019/ 3251
दिनांक:- 24 OCT 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एच.एम.सी.टी,
पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था, नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शै. वर्ष 2019-20 मध्ये प्रवेश प्रक्रियेकरीता आपल्या महाविद्यालयास देण्यात आलेल्या सुविधा केंद्राबाबत (Facilitation Center)

शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये प्रवेश इच्छूक विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेच्या कामाकरीता विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र अपलोड करणे, चेक करणे व मंजूरी करण्याकरीता आपल्या संस्थेस सुविधा केंद्र (Facilitation Center) देण्यात आले होते.

या कार्यालयातर्फे नियुक्त केलेल्या गोपनीय समितीव्दारे काही सुविधा केंद्राची तपासणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच विद्यार्थ्यांच्या गुणपत्रीका, जात प्रमाणपत्रे, नॉन क्रिमीलीयर व इतर प्रमाणपत्र चुकीचे अपलोड केलेले असल्याचे निदर्शनास आले आहेत तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याची पावती व काही विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रा ऐवजी कोरे पेपर अपलोड केल्याचे निदर्शनास आले आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे, भविष्यात अशा प्रकारच्या चुका होणार नाही याबाबत आपल्या संस्थेतील सुविधा केंद्र पथकास निदर्शनास आणून देण्यात यावे.

(डॉ. राम निबुदे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc